'ख्रिस्त सुमने'

मार्च २०२१

खाजगी वितरण

१४ मार्च २०२१, गुरुवार

डी. प्रशांत शहाराव ये. सं.

२ इति ३६:१४-१६, १९-२३

इफि २: ४-१०

योहान ३: १४-२१

"...देवाच्या पुत्रावर श्रद्धा ठेवणाऱ्याचा नाश होऊ नये परंतु प्रत्येकाला अनंत जीवन लाभावे."

प्रायश्चित्त काळामध्ये आपण जर वाचनांकडे बारकाईने लक्ष दिले तर एक गोष्ट आपल्या लक्षात येईल की मनुष्य म्हणून आपण किती वेळा आपल्या वागण्याने, कृतीने, बोलण्याने परमेश्वरापासून दूर जात असतो आणि तोच परमेश्वर आपल्याला प्रत्येकवेळी क्षमा करून त्याच्या जवळ घेत असतो. आजच्या वाचनांमध्ये आपल्याला परमेश्वराचे एखाद्या आईसारखे रूप बघण्यास मिळते. इस्त्रायली लोक जेव्हा आपल्या कृतीतून परमेश्वराची आज्ञा पाळण्यास नाकारतात, संदेष्ठयांच देखील ऐकत नाही तेव्हा परमेश्वर त्यांना शिक्षा करतो आणि लोकांना बंदिवासात राहावे लागते. परंतु एखादी आई आपल्या लेकराला त्याच्या वागणुकीवरून शिक्षा केल्यानंतर ज्याप्रमाणे जवळ घेते त्याच प्रमाणे परमेश्वर आपल्या लेकरांना जवळ घेतो.

शुभवर्तमानामध्ये प्रभू आपल्या शिष्यांना तारणाच्या योजनेविषयी माहिती सांगत आहे. संपूर्ण मानवजातीला तारण प्राप्त करून देण्यासाठी प्रभूला क्रुसावर उंच करण्यात येईल. ज्या प्रमाणे मोशेने ओसाड प्रदेशात सर्प उंच केला होता आणि त्याच्याकडे पाहून लोक सर्पदंशापासून बरे झाले होते त्याच प्रमाणे ख्रिस्ताकडे बघून आपल्याला तारण प्राप्त होईल. संत पौल आजच्या दुसऱ्या वाचनामध्ये म्हणतो, "परमेश्वराची दया, त्याची कृपा ही आपल्याला देण्यात आलेली एक महान देणगी आहे." एकांतात बसून जर आपण आपल्या जीवनावर मननचिंतन केले तर आपल्या लक्षात येईल की कश्याप्रकारे परमेश्वराने आपल्याला जीवनाच्या प्रत्येक पाऊलावर दया दाखवली आहे आणि त्याच्या अस्थित्वाचा अनुभव दिलेला आहे. आपण सत्कृत्ये करावीत म्हणून आपल्याला ख्रिस्त येशूशी एकरूप करण्यात आलेले आहे. चला तर मग या प्रायश्चित काळामध्ये स्वतःचे आत्मपरीक्षण करुया आणि आपले पापमय मार्ग सोडून देवाच्या दयेचा अनुभव घेऊया.

प्रार्थना: हे प्रभो, आमचे पापी जीवन त्यागून तुइया मार्गावर चालण्यास आम्हाला तुझी कृपा दे.

१५ मार्च २०२१, सोमवार

ब्र. प्रवीणकुमार फ्रान्सिस ये.सं.

यशया ६५: १७-२१
योहान ४: ४३-५४

संदेष्ट्याला स्वत:च्या देशात सन्मान नसतो या ओळीवर खेद करणे खूप सोपे आहे. परंतु आपणही असेच वागत नाही याची खात्री आपण करू शकतो का? अनेकदा आपल्याला प्रभू येशूबद्दल सर्व काही माहित आहे, त्याची वचने आपण ऐकली आहेत असे आपल्याला वाटते. तेव्हा त्यात नवीन काय असू शकते असा निष्कर्ष आपण काढतो. परमेश्वर वेगवेगळ्या माध्यमांद्वारे सदैव आपल्याशी बोलत असतो. जर श्रद्धेच्या डोळ्यांनी पाहिले तर सर्वत्र चमत्कार दिसतील. परंतु आपण जीवनातील ह्या लहान लहान चमत्कारांकडे दुर्लक्ष करून मोठ्या आणि नवीन चमत्कारांची वाट पाहत असतो.

सुरुवातीला येशूने आपल्या आजारी मुलाकडे यावे अशी अधिकाऱ्यांची इच्छा होती. परंतु येशूने बोललेल्या शब्दांवर मात्र विश्वास ठेऊन तो आपल्या घरी परततो. त्याने केलेली विनवणी नम्रपणे आणि मनापासून केलेली प्रार्थना होती. येशूला त्याच्या प्रार्थनेत खरा विश्वास दिसला. त्याच्या ह्याच श्रद्धेमुळे त्याचे मुलही बरे होते. संकट प्रसंगी आपण प्रभूच्या वचनांवर विश्वास ठेऊन त्यांना सामोरे जातो का? प्रभु, आश्चर्यचकित आणि विश्वासाने माझे शब्द तुला नवीन डोळे आणि कान देऊन मला मदत करो. येशू म्हणतो तसे चमत्कार आणि अदभुत कामे पाहिल्याशिवाय अनेकदा आपण विश्वास करत नाही. प्रभूच्या वचनांवर विश्वास ठेऊन आपले आयुष्य प्रभूकडे स्वाधीन करण्यास आपण तयार आहोत का? ह्या प्रायश्चित काळात आपण विशेषकरून संपूर्ण लोकांसाठी प्रभूकडे प्रार्थना करूया. केवळ स्वत:च्या वाचनाद्वारे बरे करण्याची क्षमता प्रभूकडे आहे या विश्वासाने जगातील सर्व रोग्यांसाठी, विशेषत: कोरोना रोगाने त्रस्त लोकांना प्रभूसमोर आणूया. त्याच प्रमाणे आपल्या मानसिक व आध्यात्मिक रोगांपासून मुक्त करण्यासाठी प्रभूकडे प्रार्थना करूया.

प्रार्थना: हे प्रभु, आश्चर्य आणि विश्वासाच्या नावीन्याने तुझे वचन ऐकण्यास आम्हाला मदत कर.

१६ मार्च२०२१, मंगळवार

ब्र. मनिएल क्षीरसागर ये.स.

यहेज्केल ४७:१-९,१२
योहान ५:१-१६

"तुला बरे होण्याची इच्छा आहे काय?"

आजचे पहिले वाचन यहेज्केल या पुस्तकातून घेतलेले आहे आजच्या वाचनामध्ये एका नदीचा उल्लेख केलेला आहे. तिची लांबी- रुंदी, ती किती खोल आहे व तिच्या वाहण्याच्या दिशा याबद्दल सविस्तर वर्णन केलेले आहे. या मागचा हेतू हाच की हि नदी साधी नदी नसून तिचा उगम पवित्र स्थानातून झालेला आहे. याचा परिणाम म्हणून ही नदी ज्या ज्या ठिकाणी जाईल त्या त्या ठिकाणी जीव-जंतू भरपूर असतील, मासे भरपूर असतील. जेथे जेथे हि नदी जाईल तेथे सर्व काही निरोगी होईल. या नदी मध्ये व तिच्या अवतीभोवती सर्व प्राणी जिवंत राहतील. नदीच्या आजूबाजूला असणाऱ्या वृक्षांना भरपूर व वेगवेगळ्या प्रकारची चविष्ट फळे येतील. हे वृक्ष कधीही मरणार नाही. त्यांना प्रत्येक ऋतूत पुष्कळ फळे येतील व त्यांची पाने औषधी असतील. हे वर्णन काहीसे आपणाला आपल्या जीवनाबद्दल ही सांगून जाते. आपल्याही जीवनरूपी प्रवासाचा उगम हा परमेश्वरापासून झालेला आहे. आपणही ज्या ज्या ठिकाणी जाऊ त्या त्या ठिकाणी परमेश्वराच्या कृपादानाने व वचनाने इतरांचे जीवन प्रफुल्लित करत गेलो पाहिजे. आपल्या अवतीभवती परमेश्वराचा संदेश लोकांना सांगितला पाहिजे. आनंदाचे व प्रेमाचे वातावरण निर्माण केले पाहिजे. या पवित्र नदीप्रमाणे परमेश्वराच्या रूपाचा जीवनस्त्रोत बनण्याचे भाग्य आपल्याला मिळाले आहे.

आजच्या योहानकृत शुभवर्तमानात प्रभू येशू एका बेथसदा तळ्याजवळच्या पंगु मनुष्यास बरे करतो. पंगू असल्या कारणाने तो त्या तळ्यात जाऊ शकत नव्हता व स्वतःला बरे करू शकत नव्हता. त्याला कोणी मदतही केली नाही. प्रत्येक आजारी मनुष्याने त्या तळ्यात जाऊन स्वतःचा स्वार्थ साधण्याचा प्रयत्न केला. परंतु जेव्हा प्रभू येशू त्याची दयनीय अवस्था बघतात तेव्हा त्याला त्याचा कळवळा येतो. त्याला त्याची दया वाटते व ते त्याला विचारतात की तुला बरे होण्याची इच्छा आहे काय? त्याचे केविलवाने व पश्चातापी अंतःकरण ओळखून प्रभू येशू त्याला बाज उचलून घेऊन घरी जाण्यास सांगतात. जेव्हा पुरुशी व यहुदी यांना बरे झालेल्या माणसाच्या साक्षीने कळते की प्रभू येशू शब्बाथ दिवशी लोकांना बरे करत आहेत तेव्हा ते त्याचा राग राग करतात. आजची दोन्ही वाचने आपल्या हृदयाला परमेश्वराच्या प्रेमाचा व दयेचा स्पर्श करून देतात. आपल्या पापी अंतःकरनाला परमेश्वराची गरज आहे. प्रभू दयेचा सागर आहे त्यामध्ये आपण नाहून निघाले पाहिजे.

प्रार्थना: हे प्रभू तुइया प्रेमाचा व क्षमेचा अनुभव माइया अंतःकरणाला येवो !

१७ मार्च २०२१, बुधवार

संत पॅट्रिक,बिशप

फा. अंथोनी त्रिभुवन,ये.सं.

यशया ४९:८-१५; योहान ५: १७-३०

"पिता आणि मी एक आहोत."

आज देऊळ माता संत पॅट्रिकचा सन साजरा करीत आहे. चौथ्या शतकामध्ये संत पॅट्रिकचा जन्म ब्रिटनमध्ये झाला होता. १७ मार्च रोजी सुमारे ४६० इ.स. मध्ये त्याचा मृत्यू झाल्याचे समजते. असे मानले जाते की पॅट्रिकने पहिल्यांदा आपल्या कैदेत असताना आयरिश लोकांना प्रभू येशू ख्रिस्ताच्या प्रेमाचा संदेश देण्याचे ठरवले आणि त्यांचा धार्मिक कार्याद्वारे देवाच्या दयेचा आणि प्रेमाचा संदेश त्यांनी इतरांपर्यंत नेटानं पोहचवला.

आपल्याला ठाऊक आहे कि देवाने सुंदर पृथी आणि पृथ्वीवरच्या सर्व गोष्टी आणि जीव निर्माण केले. देवाने त्याच्या इच्छेप्रमाणे निर्माण केलेल्या सृष्टीची काळजी घेण्याचे किंवा त्याच्या कार्याला पूर्णविराम दिला नाही तर तो नेहमीच सक्रीय आहे. त्याच्या प्रत्येक हस्तकृतीत त्याचे अस्तित्व आपल्याला अनुभवता येते. देवाच्या प्रेमापासून भरकटत गेलेल्या मानवजातीला पुन्हा त्याच्या प्रेमाच्या छायेखाली घेण्यासाठी देवाचा एकुलता एक पुत्र आमचा प्रभू येशू ख्रिस्त या जगात आला आणि त्याने देव पित्याची इच्छा पूर्णत्वास नेली. प्रभू येशू नेहमीच आपल्या पित्याच्या सहवासात वावरला आणि प्रत्येक गोष्टीत आणि त्याच्या प्रत्येक कार्यात त्याने देव पित्याची इच्छा जाणून घेण्याचे आणि त्याला प्रथम स्थान देण्याचे टाळले नाही. तो देव पित्यामध्ये आणि पिता त्याच्यामध्ये एकरूप होता आणि त्याने केकेले सर्व महात्कर्त्ये पिता करीत असल्याचे त्याने सांगितले. ख्रिस्ताने बोललेले शब्द देव पित्याचे शब्द होते. दैनंदिन जीवन जगत असतांना आपण देवाची इच्छा जाणून घेणे अत्यावश्यक आहे. त्याच्या वचनांवर विश्वास ठेवून आणि त्याच्या सहवसात राहून आपण त्याच्या ऐक्याचा आणि त्याच्या प्रेमळ दयेचा अनुभव घेऊ शकतो.

प्रार्थना : हे प्रभू येशू ख्रिस्ता तुइया प्रमाणे देव पित्याची इच्छा जाणून घेण्यासाठी आणि त्याच्यावर प्रेम करण्यासाठी आम्ही तुला अनुसरावे आणि विश्वासाने तुला शरण जावे अशी कृपा दे.

१८ मार्च २०२१, गुरुवार

जेरुसलेमचे संत सिरील

फा. पट्रिक मार्टिन ये.सं.

निर्गम ३२: ७-१४

योहान ७:३१-४७

"शुभवर्तमानावर विश्वास ठेवा."

देवाने त्याच्या प्रेमाच्या सामर्थ्याने सृष्टीची निर्मिती केली आहे. त्याच्या प्रेमाचा अनुभव घेण्यासाठी ठराविक काळी त्याने इस्राएली लोकांना पाचारण केले. अन्याय, जुलूम आणि लाचारी यांचे प्रतिक बनलेल्या लोकांना देवाने स्वताच्या गौरवासाठी निवडिले आणि त्यांच्यामधून जगाचा तारणारा प्रभू येशू ख्रिस्त या पृथ्वीवर मानव बनून जन्मी आला. ज्या इस्राएली लोकांना देवाने गुलामगिरीतून मुक्त केले होते अशा लोकांची तो प्रतिक्रिया पाहत आहे. देव मोशेला त्यांच्या पापांबद्दल जागरूक करत आहे. देवाने त्यांना एक मोठे राष्ट्र बनवायचे ठरवले पण तरीही इस्राएल लोकांनी परमेश्वराविरूद्ध पाप केले. पाप हा परमेश्वराच्या मार्गापासून दूर जाण्याचा मार्ग आहे. पाप, देवाचे प्रेम विसरून जाण्याची प्रक्रिया वेगवान करते. देव त्याबद्दल आपली नाराजी व्यक्त करतो. देवाने व्यक्त केलेली नाराजी न्याय्य आहे. देवाचे आपल्यावर प्रेम आहे म्हणून आपण चुकलो असतांनाही तो आपल्यावर दया दाखवतो आणि पुन्हा त्याच्याकडे येण्यासाठी आपल्याला कृपा देत असतो.

आजच्या शुभवर्तमानात इतिहासाची पुनरावृत्ती होताना दिसते. मोशेने इस्राएली लोकांना मिसर देशातून बाहेर आणिले आणि देवाच्या कृपेने आणि मार्गदर्शनाने त्याने लोकांना देवाकडे वळविले असतांनाही त्यांनी त्याच्यावर अविश्वास दर्शविला. ह्याद्वारे त्यांनी मोशेवर नव्हे तर देवाच्या महान दयेवर आणि त्याच्या प्रेमावर अविश्वास दर्शविला होता. आज प्रभू येशू ख्रिस्त इस्राएली लोकांना त्यांच्या अविश्वासूपणाची आठवण करून देतो. त्यांच्यावर देवाने सिद्ध केलेले तारण आले असतांनाही इस्राएली लोकं त्यांच्या आंधळेपणामुळे ते ओळखू शकत नव्हते. त्यांच्या प्रमाणे आपल्यालाही ख्रिस्तामध्ये तारण प्राप्त झाले असून त्याचा स्वीकार करण्यासाठी विश्वासाची कृपा प्राप्त व्हावी आणि देवाच्या प्रेमाला योग्य प्रतिसाद द्यावा म्हणून आज प्रार्थना करूया.

प्रार्थना: हे प्रभू येशू ख्रिस्ता, तुझ्या प्रेमाची जाणीव होण्यासाठी आम्हाला विश्वासाचे दान दे.

१९ मार्च २०२१, शुक्रवार

संत योसेफ यांचा सण

डी. वेलिन्टन पाटील ये. सं.

२ शमु ७:४-५,१२-१४,१६

रोम ४:१३,१६-१८,२२

मत्तय १:१६,१८-२१

"योसेफ नीतिमान होता"

आज आपण संत योसेफ यांचा सण साजरा करत आहोत. जोसेफ मरियेचा पती व येशूचा पाळनकर्ता होता. येशूचा जन्म जरी कुमारी मरियेद्वारे पवित्र आत्म्याच्या सहाय्याने झाला असला तरी त्याचे संगोपण व रक्षणाची जबाबदारी योसेफाची होती. हे सर्व देवाच्या योजने नुसार होते. योसेफाने मरियेचा व तिच्या बाळाचा सांभाळ स्व:तच्या जिवापार केला.

यहुदी समाज्यात वंशांवळीला फार महत्व होते. संदेष्टांच्या मते मसिहा (तारणकरता) हा दविदाचा घराण्यातून असणार असे भाकीत होते. योसेफ दाविदाच्या वंशातून असल्यामुळे येशूलाही तो वारसा मिळतो. व संदेष्टांची सर्व वचने येशूमध्ये पूर्ण होतात. जोसेफाने देवाचा शब्द पूर्ण केला. त्याला पडलेल्या स्वप्नावर त्याने विश्वास ठेवला. बायबल मध्ये जोसेफ बद्दल फारच कमी लिहिले आहे. परंतु जे काही लिहिले आहे ते जोसेफाचा धावा करण्यासाठी पुरेसे आहे. देवावरील दृढ विश्वासामुळे जोसेफने मरियेला पाठिंबा दिला. तिच्या सुख दु:खात जोडीने राहिला. जेव्हा येशू मंदिरात हरवला होता तेव्हा त्याला शोधत मरिया व जोसेफ मंदिरात आले. मरिया येशूला म्हणाली की मी व तुझे वडील तुझा शोध करत आहोत. मरियेसाठी जोसेफ येशूचे वडील होते. जोसेफ मुळे पवित्र कुटुंब सुरक्षित राहिले. येशूवर चांगले संस्कार झाले. येशू सुतारचा मुलगा म्हणून ओळखला गेला. जोसेफ यांचा मेहनतीपणा, खरे पणा, देवाच्या शब्दाला तत्पर राहणे हे सर्व गुण येशू मध्ये आढळतात.

आपण ही जीवनात देवाच्या शब्दावर चालायला शिकले पाहिजे. नाजरेथ गावातील हे पवित्र कुटुंब सर्व कुटुंबांसाठी आदर्श असले पाहिजे. आई-वडिलानी आपल्या मुलांचा सांभाळ मरिया व जोसेफ प्रमाणे केला पाहिजे. आज जगात बऱ्याच सामाजिक, शैक्षणिक, धार्मिक व इतर संस्था संत जोसेफ यांना आश्रयदाता मानतात.

प्रार्थना: हे देवा, संत जोसेफ प्रमाणे सज्जन व देवाच्या शब्दावर विसंबून राहणारे जीवन जगण्यास कृपा दे.

२० मार्च २०२१, शनिवार

फा. प्रविण त्रिभुवन ये.सं

यिर्मया ११:१८-२०

योहान ७:४०-५३

"जो देवापासून आहे तो देवाची वचने ऐकतो"

आजच्या पहिल्या वाचनात लोक यिर्मया याच्याविरुद्ध कट करतात. त्याला ठार मारण्याचे ठरवतात आणि तेच परमेश्वर त्याला कळवितो. यिर्मयाचा परमेश्वरावर विश्वास आहे. परमेश्वर त्यांना त्यांच्या कर्माचे फळ निश्चितच देईल. परमेश्वर न्यायी आहे. तो प्रत्येकाचा त्यांच्या कर्मानुसार न्याय करत असतो.

आजच्या शुभवर्तमानामध्ये लोक येशूविषयी म्हणतात की हा खरोखर संदेष्टा आहे. तर काहीजण म्हणाले की हा ख्रिस्त आहे. काहींनी प्रश्न उभा केला की ख्रिस्त गालिलातून येतो काय? काहींना आठवण होते की शास्त्रात असे लिहिले आहे की दाविदाच्या वंशाचा व ज्या बेथलेहेमांत दाविद होता त्या गावातून ख्रिस्त येणार होता. ह्यावरून लोकसमुदायत फूट पडली. अनेक जण येशुच्या विरोधात होते. शास्त्री व पुरुशी यानी ज्या कामदारांना येशुकडे पाठवले होते त्यांना येशु विषयी आश्यर्य वाटले. कारण त्यांना त्याच्यासारखा आतापर्यंत कोणीही मनुष्य भेटला नव्हता. त्यामूळे त्याच्या मनात येशुविषयी आदर निर्माण झाला. येशूच्या शिकवणुकीमुळे अनेक लोक त्याच्याकडे प्रभावित झाले. कारण त्याच्या शिकवणुकीमध्ये व कृतीमध्ये फरक नव्हता. जेव्हा एखादा मनुष्य आपल्या शब्दाप्रमाणे वागतो तेव्हा लोक आपोआप त्या व्यक्तीचा आदर व सन्मान करतात. शास्त्री व परूशी ज्याप्रमाणे बोलत असे त्याप्रमाणे ते आचरण करत नसे. त्यांची अपेक्षा होती की लोकांनी त्यांच्या शब्दाप्रमाणे वागावे. येशुसुद्धा लोकांना सांगतो की शास्त्री व परुशी ज्याप्रमाणे तुम्हाला शिकवतात ते तुम्ही ऐका पण त्याच्या प्रमाणे वागू नका आजच्या जगात अनेक लोक आहेत ते फक्त बोलतात पण त्याप्रमाणे वागत नाही. पण त्यांची अपेक्षा असते की लोकांनी त्यांच्या शब्दाचा मान राखावा.

प्रार्थना: हे परमेश्वरा आम्हाला येशूच्या शिकवणुकी नुसार वागण्यास आम्हाला तुझी कृपा दे.